Historicity Research Journal
Volume 2 | Issue 5| Jan 2016

Impact Factor : 0.4521(UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

आदिवासी समाज

चंद्रकला बसाप्पा शिलेदार
कला,वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय,उमदी

सारांश :

स्थिर समाजात अनेक घटक समाज रचनेच्या अस्तित्वासाठी आवश्यक असतात. आहे त्या समाजातून ते निवडले जातात. शेतकरी जरी अशा शेतीआधारित व्यवस्थेत महत्वाचा असला तरी शेतीसाठी व दैनंदिन जीवनातील गरजांचे पुर्ती करण्यासाठी आहे त्या समाजातूनच कुशल लोक पुढे येतात. आदय प्रथम जीवनोपयोगी व्यवसाय म्हणजे सुतार काम,पाथरवटकाम,गवंडीकाम, कुभांरकाम, चर्मकारकाम, इत्यादी जसे पुढे मानवोपयोगी शोध लागत गेले तसतसे पुढे अजुन कौशल्याधारित विभाजन होत गेले. हे एक प्रकारे प्राथमिक कार्यविभाजन असते. म्हणजे ही तशी अत्यंत सोपी, सैल आणि प्रवाही संरचना असते. टोळी मानव हा नगर मानव बनलेला आहे. काही टोळया अदयापही भटकेपणाच्या उर्मीतुन बाहेर पडलेल्या नसतात. काही टोळया वन्य जीवनातील साधेपणातच दंग राहतात. व नागर समाजापासून शक्यतो फटकून दूर राहत असतात. त्याना आपण आज आदिवासी म्हणतो. कोणी कोणती जीवनशैली निवडायची याची स्वातंत्र्य होते. नागरी व्यवस्था विरूध्द अरण्यवासीची साधीसुधी अत्यंत कमी गुतांगुंतीची नैसर्गिक जीवनव्यवस्था या पुरातन काळीच निर्माण झाल्या. आक्रमक आर्यांनी पराजितांना हाकलून रानावनांत राहायला भाग पडले ते आदिवासी. अशी मांडणी आज डॉ.तूकाराम रोंगटे सारखे काही आदिवासी साहित्यिक करतात.

प्रस्तावना:

मानवी इतिहासाच्या प्रदीर्घ इतिहासात डोकावून पाहिले तर लक्षात येते की एकही मनुष्य आपला आदिम पूर्वज नेमका कोणत्या भूमीवरचा हे कधीही सांगू शकत नाही. आपले पुरातन पुर्वज हे भटके आदिवासीच होते.

आदिवासी :–

नागर संस्कृतीपासून दूर राहिलेले मुळचे राहिवाशी आर्य व द्रविड हे भारतातले दोन मोठे मानव समाज सोडून त्याच्याही पुर्वी भारतात राहणाऱ्या किंवा बाहेरच्या देशातून येऊन वने व पर्वत यांच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातीना वन्य जाती किंवा आादिवासी असे म्हणतात. मानवंशशास्त्रदृष्टया वन्य जाती हा भारतीय लोक समाजाच्या प्राचीनतम विभाग आहे. जगातल्या सर्व देंशात वन्य जातीचा आढळ होतो. आादिवासी हे भारतातील आदय वसाहतकार मानले जातात. हे लोक आत्मसंरक्षणास तितकेसे समर्थ नव्हते. त्यामुळे भारतात पश्चिम, वायव्य,ईशान्य या दिशाकडून आलेल्या अनुक्रमे द्रविड,इंडोआर्यन व मंगोलियन या लोकांपुढे त्याच्या टिकाव लागला नाही.नवागत लोक हे संख्याबलानेच नव्हे तर साधनसामुग्रीनेही वरचढ असल्यामुळे वन्य जमातीना त्यांच्यापुढे हार खावी लागले व डोगंरदऱ्याचा किंवा जंगलाचा आश्रय करावा लागला. आजही ते अशाच जागी कायमची वस्ती करून राहिलेले दिसतात. त्यांच्यापैकी ज्यांनी आपले मुलस्थान सोडले नाही, ते हळूहळू नष्ट तरी झाले किंवा नवगतांशी एकरूप होऊन आपले

स्वतंत्र अस्तित्वच हरवून बसले.

आादिवासीचे अनेक जाती उपजातीत विभाजन झालेले असून त्यातील प्रत्येक जात स्वतंत्र समजली जाते. प्रत्येक जात आपल्या जातीत किंवा पोट जातीतच विवाहसंबध करते. प्रत्येक जातीच्या स्वताःच्या अशा काही चालीरितीही आहेत. तथापि सर्वाचा साकल्याने विचार करता सर्व आदिवासीची सामान्य अशी लक्षणे दिसतात.

1) ते सुधारलेल्या जगापासून दुर तसेच दूर्गम दऱ्याखोऱ्यात राहतात.
2) नेग्रिटो, प्रोटो– आस्ट्रालाईड किंवा मंगोलाईड यापैकी कोणत्यातरी एका मानववंशाशी त्यांच्या संबध आहे.
3) जातीविशष्ट अशी एकच बोली ते बोलतात.
4) ते भुताखेताचे व पितरांची पुजा करतात.
5) शिकार,कंदमुळे ,फळे, यावर ते आपली उपजिविका करतात.क्वाचित डोंगरातील शेती करतात.
6) बहूतेक सगळे मांसाहारी असतात.
7) ते नग्न किंवा अर्धनग्न स्थितीत राहतात. लज्जा रक्षणासाठी झाडांची पाने व साली याचा उपयोग करतात.
8) त्यांच्यात भटकण्याची प्रवृत्ती असते.
9) त्याना मदय व नृत्य यांची विशेष आवड असते.

इंडियन कॉन्फारन्स ऑफ सोशल वेल्फेअर वर्क्स या संस्थेच्या विदयमाने ट्रायबल वेल्फेअर कमिटीचे कलकत्ता येथे जे अधिवेशन झाले. त्याप्रसंगी एकत्र आलेल्या मानववंशशास्त्रज्ञांनी व समाजकार्यकर्त्यानी सध्या भारतात विदयमान असलेल्या वन्य जातीचे वर्गीकरण केले आहे ते असे.

1) वन्यसमाज :–

दऱ्याखोरी किंवा दाट अरण्ये अशा मूल वस्तीस्थानांना धरून राहिलेले व प्राचिन जीवनक्रम चालविणारे लोक या वर्गात येतात.

2) अर्धवन्य समाजः–

ग्रामीण भागात गावालगत येऊन वसलेले शेती आणि तदनुषंगिक व्यवसाय करणारे लोक या वर्गात येतात
.

3) संस्कारित वन्य जमाती :–

जे शहरात किंवा अर्धनागरी प्रदेशात जाऊन सुधारलेल्या उदयोगधंदयात पडले आहेत व ज्यांच्यावर आधुनिक जीवनाचे संस्कार झाले आहेत असे लोक या वर्गात येतात.

4) विलीन जमाती :–

हिंदूसमाजरनेत पूणेपणे विलीन झालेले लोक या वर्गान येतात.

• वन्यजमातीची प्रदेशावार विभागणी :–

गुजरातच्या पूर्वेस, मध्यप्रदेशातील पठाराच्या दक्षिण भागात पसरलेला विंध्य व सातपुडा यांच्याशी जवळजवळ समांतर असे जंगले व दऱ्याखोरी यांनी व्यापलेला जो प्रदेश आहे, ते या वन्यजमातीचे प्रमुख वसतिस्थान होय. याच्या खालोखाल वन्यजमातीचा दुसरा मोठा भूप्रदेश म्हणजे आसामला ब्रहमदेशापासून विभक्त करणारा डोंगराळ प्रदेश हा होय.भारतातील वन्यजमातीजी वस्ती ज्या भू– भागात केंद्रीत झाली आहे. ते भूभाग विचारात घेऊन वन्य जमातीच्या वस्तीचे भौगोलिक विभाग पुढीलप्रमाणे दिसतात .

भौगोलिक विभाग :–

1) हिमालयाला लागून असलेला प्रदेश, भारताच्या पूर्व सीमेवरील पर्वतराजी ,मध्यखासिया व गारो टेकडया हा एक विभाग होय.
2) नर्मदा व गोदावरी यांच्यामधला प्रदेश, दक्षिण भारताला व उत्तर भारताला विभक्त करणारी जी पर्वतराजी आहे. ते वन्यजमातीचे प्राचीन कळापासूनचे प्रमुख आश्रयस्थान आहे. पूर्वेस संताळ परगणा,दक्षिणेस हैद्राबाद (आंध्र) पश्चिमेस गुजरात व उत्तरेस राजस्थान या चतुः सीमामध्ये हा प्रदेश येतो.यात प्रामुख्याने भिल्लांची वस्ती आहे.
3) पश्चिम घाटातला ,दक्षिणेकडील वायनाडपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेला प्रदेश. वर उल्लेखिलेल्या विभांगाखेरीज भारताच्या अन्य काही भागांत व अंदमान –निकोबार या बेटांत राहणाऱ्या वन्यजमातीच्या आणखी एक विभाग कल्पिता येईल.

भारतातील भिन्न–भिन्न प्रदेषांत पुढिल आदिवासी व वन्य जमाती आढळतात.

1) आंध्रप्रदेश – चेंचू, कोया, गदब, जतपुस, कोंडा–दोरा, कोंडा–कापूस, कोंडा–रेडी, खोंड, गुगली(लंबागी) ,येनाडी,येरूकुल, भिल्ल, गोंड, डोंगरी, रेडी, वाल्मिकी, परधान(बोगता)

2) आसाम – गारो,खासी, कुकी,मिझो, मिकिरनाग,अबोर, डफला,मिश्मी अपातानी, सिंग्फो(काचरी)
3)बिहार :– असुर, वैगा,बंजारे, बिरहोर, गोंड, हो, खाडीया, खोंड,मुंडा, कोरवा,उरॉव,संताळ,माल,महाडिया, भूमिज,सवर,पहाडिया(मुसाहर,भाऊ)
4) महाराश्ट्र व गुतरात :– भिल्ल, गोंड, वारली, कोळी, ठाकूर, दुबळा,बैगा, गदब, कमार, कातकरी, खाडिया,खोंड, कोल, कोलम, कोरकू, कोरवा, मुंडा, उरॉव, परधान, आणि वाघरी,
5) केरळ :– कदर, इरूल, मुधूवन, कनिक्कर, मलंकुरवन, मलयरयन, मलवेतन, मलयन (मालंपटारम येरवा) मन्नन, उल्लतन, उरळी, विशवन, अरनदन, कट्टूनैकन,कोरग, कोत, कुरिच्चियन, कुरूमन, पनियन, पुलयन, मालसर, कुरूंब,
6) मध्य प्रदेष :– कोरल, भिल्ल, बैगा, गदबा, गोंड, खोंड, कोल, कोलम, उरॉव,परधान,
7) तामिळनाडू:– तोड, कदर, इरूल, कोत, अदियन, अरनदन, कट्टूनैकन, कोरग, कुरिच्चियम, मालसर, कुरूमन, मुयूवन, पसियन, पुलयन, मलयाली, कुरूंब, एरवल्लन, कनिक्कर, मन्नन, पलियन, उरळी, विशवन,
8) कर्नाटक:– गौदल, हविपिकी, इरूलिंग,(बेरड सोलेगा) जेतूकुरूब, मलैकुडी, भिल, गोंड, तोंड, वारली, चेंचू, कोया, अरनदन, येरव, होलेय, कोरम,
9) पष्चिम बंगाल :– हो, कोल, मुंडा, उरॉव, भूमिज, संताळ, गारो, लेपचा, असूर, बैगा, गोंड, बिरहार, खोंड, कोरवा, लोहार,
10) ओडिसा:– बैगा, बंजार, बिरहोर, बोंडो, चेंच, गदबा, गोंड, हो, जतपुस, जुआंग, खडिया, कोल, खोंड, कोया, उरॉव, संताळ, सवरा, पोरजा,
11) पंजाब – गद्दी, स्वगल, भोर
12) राजस्थान :– भिल्ल, गरासिया,दुबळा,गोंड, कोरकू, कोळी, सेहरीया,
13) हिमाचल प्रदेश :– गद्दी,गुर्जर,लहौल, लांब, पगवल,
14) मणिपूर :–अंगामी, मिझो, कोम, पैते, पुरूमसेमा,
15) त्रिपुरा:– लुशाई, मग, कुकी, हलम, खाशी, भुतिया, मुंडा, संताळ, भिल्ल, जमतिया, रिआंग, उच्छे,

आदिवासी किंवा वन्य ही काही एकरस,अखंड जमात नव्हे. त्याच्यात तीनशेहून आधिक वेगवेगळया जमाती आहेत. या सर्व जरी वन्य असले तरी भाषा,पोशाख,चालीरिती,देवधर्म, या सर्व गोष्टीत त्यांच्यामध्ये खुप फरक आहे.

आदिवासी संस्कृती :–

आदिवासीच्या भाषेत नव्हे, तर त्यांच्या आचार –विचारातही भरपूर विविधता आढळते. काही जमातीत पितृप्रधान कुटुंबसंस्था आहे, तर काहीत मातृप्रधान आहे. काही जमातीत बहुपत्नीकत्व आहे,तर काहीत बहुपतित्वही आहे. काहीत उच्च–नीच अशा कुळयाही आहेत. काही जमातीत अस्पृश्याताही आढळते. परधान हे गोंडाचे आश्रित व अस्पृश्य गणले जातात. गंदा, पंका, कम्मार, ओझा, नागरची, इ. आदिवासी अस्पृश्य गणले जातात. ज्यांनी आपले सांस्कृतिक स्वातंत्र्य टिकवून ठेवले आहे. असे गोंड, मेइथेइ हे स्वतःला क्षत्रिय समजतात. सामान्यतः निकृष्ट शेती करणारे हीन व उत्कृष्ट शेती करणारे उच्च समजले जातात.

आदिवासीच्या संस्कृतीची घडण अगदी साधी आहे. जे काही विनामुल्य व सुलभतेने मिळते. त्यावर ते आपल्या चालीरिती,हौसमौज व उत्सव–समारंभ भागून नेतात. सामान्याताः सर्व आदिवासीत स्वातंत्र्य प्रियता आढळते. नोकरी करणे किंवा कायमचे एखादया ठिकाणी स्वतःला बांधून घेणे, हे त्यांना आवडत नाही.एखादी नोकरी सोडून दयायला त्यांना नाममात्र निमित्त पुरते.

बहुतेक सर्व आदिवासीना विस्तव तयार करणे, हत्यार बनविणे, घरे बांधणे, मातीची भांडी बनविणे, लाकुडकाम करणे व वस्त्रे विणणे या कला अवगत असतात. प्रत्येक जमातीला आपली अशी स्वतंत्र भाषा आहे. शिक्षणाची किंवा पारंपारिक ज्ञान देण्याघेण्याची पध्दतही सर्वत्र सारखीच आहे. काय करावे व काय करू नये याचे शिक्षण प्रत्येक आदिवासीला त्यांच्या आई–बापाकडून मिळत असते. परंपरागत लोककथा,दैवतकथा यांच्याआधारे त्यांचे जीवन व्यवहार नियमित होतात. जी गोष्ट त्यांच्या कल्पनेच्या आटोक्यात येत नाही,ती करून दाखविणारी व्यक्ती त्यांना असामान्य वाटते.

नृत्य ही त्यांच्या आनंदाची परिसीमा आहे. काही आदिवासी चर्मवादये,सुषिरवादये स्वतः बनवितात व नृत्यात त्यांचा उपयोग करतात.नृत्यात बेहोषी येण्यासाठी दारू पिण्याची चाल बहूतेक आदिवासीत आहे. त्यांची नृत्य त्यांच्या देवधर्माशी संबध्द असतात.

समाजव्यवस्था अगदी साधी असते.जोवर मुलांना स्वतःचे अन्न स्वतंत्ररीत्या मिळविणे शक्य नसते, तोवरच आईबाप त्यांची जबाबदारी वाहतात. मुले–मुली वयात आल्यावर त्यांची लग्ने होतात. स्त्री–पुरूषांवर विशिष्ट कालात काही बंधने असतात. गरोदरपणी स्त्रियांनी पाळावयाचे नियम प्रत्येक जमातीत निरनिराळे असतात. जन्म, मृत्यू, विवाह इ. प्रसंगी पुरूषांनी पाळायचे नियमही भिन्न–भिन्न असतात. मुलांना पूर्वजांची नावे ठेवतात. मृतात्म्यांच्या संतोषासाठी श्राध्दासारखे काहीतरी विधी करायची प्रथा सर्व आदिवासीत आढळते. बायका अंगावर गोंदून घेतात. जुन्या काळी स्तनांवर व पाठीवर चोळीसारखे गोंदून घेण्याची प्रथा होती. पण आता ती हळुहळू नष्ट होत आहे.

विवाहपध्दतीः–

विवाह कोणाशी करावा, या बाबतीत आदिवासीत काही नियम ठरलेले आहेत.प्रत्येकाने आपल्या जमातीतूनच आपला जोडीदार निवडला पाहिजे,असा नियम आदिवासी जमातीत दिसून येतो. याचप्रमाणे एखादया विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या जमातीने त्याच प्रदेशातील व एका गावातील लोंकामधून जोडीदार निवडला पाहिजे. असेही काही नियम आढळतात. काही वेळा एखादया जमातीचे काही विभाग पडतात व ते वेगवेगळया ठिकाणी राहू लागतात. त्यांच्यापैकी एखादया विभागातील लोक आपल्याला इतर विभागापेक्षा श्रेष्ठ मानतात व त्या विभागातील लोंकाशी रोटी–बेटीव्यवहार करीत नाहीत.ते फक्त आपल्या विभागात लग्ने करतात. उदा.ढोर, कातकरी परस्परांशी विवाह करीत नाहीत.एकाच कुटुंबातील लोंकानी आपापसात विवाह करायची प्रथाही काही जमातीत आढळते.

आदिवासी नृत्य :–

आदिवासी लोक नाच–गाण्याचे विलक्षण शोकीन असतात.करमा, बिहु, बा परब, इ आदिवासी नृत्य इ. प्रसिधद् आहे. त्यांच्या नृत्य गीतांचा उगम निसर्गातल्या शक्तींना संतुष्ट करण्यासाठी झाला आहे. निसर्ग शक्तींना संतुष्ट केल्यांने पीक पाणी अमाप येते व शिकार चांगली मिळते. अशी त्यांची पूर्वपार समजूत आहे. जन्माला आल्यापासून मुत्यु पर्यंत सर्व संस्कारमध्ये त्यांच्या नृत्याचे आयोजन असते सण व उत्सव या प्रसंगीसुध्दा ते बेहोष होऊन नाचतात. त्यांच्ची बहुतेक नृत्य संमिश्र स्वरूपाची असतात. स्त्री ,पुरूष, मुले, मुली एकत्र नाचतात

आदिवासी कला व कामगिरी :

आदिवासीच्या कलेला तीन उद्देशानी प्रेरणा मिळाली.

1 वस्तुंना सुंदर व आकर्षक बनविणे.

2 .समाजात प्रतिष्ठा मिळविणे.

3. धर्म

ज्याच्या दारावर खोदकाम केलेले असेल, किंवा ज्याचे घर सजविलेले असेल तो गृहस्थ त्या जमातीत श्रेष्ठ समजला जातो. आपले घर सुंदर दिसावे म्हणून तो भिंतीवर पुरणांतल्या कथा चितारतात व दारांवर शिकारीची दृश्ये चित्रित करतात.

सजावटीची प्रवृत्ती सर्वप्रथम शरीर शृंगारण्यात दिसून येते. तरूण– तरूणीची केशरचना, दागिने, नृत्यासाठी शरीरावर फुलांची व पिसांची रचना यातून त्यांची कलात्मकता दिसून येते. पण अलिकडे नागर संस्कृतीच्या संपर्कामुळे आदिवासी आपल्या मुळ कलेला विसरत चालले आहेत तिच्यात विकृतीही शिरू लागले आहे. त्यांना आपली पूर्वीची वस्त्र भूषणेही आवडेनाशी झाली. आहेत शेकडो वर्षाच्या आर्थिक शोषणामुळे त्यांच्या सर्वच कला –हासाच्या मार्गाला लागल्या आहेत. सौदर्याचा अनुभव घेणे व कलेच्या द्वारे त्यांचा आविष्कार करणे, या दोन्ही शक्ती त्यांच्यातून हळूहळू लोपत चालल्या आहेत. आदिवासीच्या कलात्मक वृत्तीला आजमितीस त्या–त्या प्रदेशाच्या सरकारांकडून प्रोत्साहन मिळत आहे. ही गोष्ट चांगली आहे.

आदिवासीसाठी सरकारच्या योजनाः–

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताच्या राज्यकारभाराबाबत जो घटना–कायदा प्रसार करण्यात आला. त्या घटनेतील एका स्वतंत्र कलमान्वये आसाम प्रांतातील आदिवासी लोकांनी व्यापलेल्या प्रदेशाचा राज्यकारभार स्वतंत्ररीत्या चालविण्यासाठी स्वतंत्र शासकाची नेमणूक करण्यात आली आहे. जमिनीची वाटणी, कर आकारणी शिक्षण व्याजबट्टा व व्यापारी विषयक सर्व व्यवहारावर नियंत्रण या गोष्टींची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे. तसेच इतर राज्यापैकी ज्या राज्यात आदिवासीची वस्ती असून त्यांनी स्वतंत्ररीत्या व्यापलेला प्रदेश आहेत, त्याविषयी उत्पन्न होणाऱ्या निरनिराळया प्रश्नावर त्या– त्या राज्यांच्या राजप्रमुखांना सल्ला मसलत देण्यासाठी आदिवासी – मार्गदर्शक मंडळे निर्माण केली आहेत.

सदर घटनेतील दुसऱ्या एका कलमान्वये वन्य जातीचे लक्षण स्पष्ट केलेले असून त्यांना योग्य ते संरक्षण मिळण्याचीही तरतूद केली आहे. कायदा अमलात आल्यापासून दहा वर्षापर्यंत लोकसभा व विधानसभा यांत त्या जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना आपले प्रतिनिधी निवडण्याचे हक्क दिले आहेत. त्यांच्यासाठी स्वतंत्र जागा राखुन ठेवण्याची व्यवस्थाही केलेली आहे. त्याप्रमाणेच जिल्हापरिषदा, नगरपालिका, ग्रामपंचायती इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थातही त्यांना लोकसंखेच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे, अशी तरतूद केली आहे.

या घटना कायदयातील कलमान्वये आसाम प्रांतासाठी सुचविण्यात आलेल्या सहा जिल्हा मंडळापैकी पाच अस्तित्वात आलेली असून, त्यांचे कार्य चालू झालेले आहे. या मंडळांना जमिनीची वाटणी, जमीनधारणा, जमिनी राखुन ठेवणे किंवा त्यांचा उपयोग करणे, राखीव जंगलाव्यतिरिक्त इतर जंगलाची व्यवस्था, कालवे व त्यांच्या पाण्याचा उपयोग ,ग्राम व नागर संभाची स्थापना,वारसा हक्क, वैवाहिक व सामाजिक चालीरीती इ. गोष्टीच्या बाबत जरूर ते कायदेकानून करण्याचे अधिकार दिलेले आहेत.

घटनेतील दुसऱ्या एका कलमान्वये सरकारी नोकरीत आदिवासी जमातीनाही त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निरनिराळया श्रेणीत जागा मिहण्याची व्यवस्था केली आहे. त्या जागाावर इतर समाजातून नोकराची भरती करू

नये असेही हुकूम संबधीत आधिकाऱ्यांना देऊन ठेवले आहे. आदिवासीचे निरनिराळया बाबतीतील हितसंबध अबाधित राहण्यासाठी कायदयाने त्यांना जे संरक्षण दिले आहे. त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत आहे की नाही. ते पाहण्यासाठी व त्यासंबधीत प्रतिवृत्त तयार करून ते वरिष्ठाकडे पाठविण्यासाठी स्वतंत्र आयुक्तांची नेमणूक केलेली आहे. सामाजिक, आर्थिक बाबतीत आदिवासी –हीतसंवर्धक अशा निरनिराळया योजना आखण्यात आलेल्या असून इ.स. 1953 सालापासून त्याची अंमलबाजवणी होऊ लागले आहे. त्यासाठी मध्यवर्ती सरकाराकडून नियमितपणे अनुदानेही दिली जात आहे.

पंचवार्षिक योजनेत आदिवासी–समाजकल्याण कार्याला विशेष चालना मिळलेली असून मध्यवर्ती सरकाराकडून व राज्यसरकाराकडूनही त्यांच्या कार्यासाठी वेगळे काढून ठेवलेले आहेत. समाजकल्याण कार्याच्या चळवळीचे काम व्यवस्थीतपणे चालावे यासाठी शिक्षण विभाग आर्थिक पुर्नरचनाविभाग व संकीर्ण विभाग असे स्वतंत्र विभाग केलेले असून त्या त्या प्रांताच्या निकडीच्या गोष्टीकडे लक्ष पुरविले जात आहे. आदिवासीच्या वसाहतीत कालवे खोदणे.शेतीची प्रात्याक्षिके,धान्यकोठार, डोंगरटेकडयातून शेती खणून तयार करणे इत्यादी नवीन गोष्टी विषयी प्रयोग चालू आहेत.

आदिवासीच्या कल्याणासाठी सर्वोदय, आदिम जातीसेवासंघ,डांग सेवामंडळ, विश्व हिंदू परिषद, कल्याण आश्रम, विवेकानंद केंद्र इत्यादी. काही संस्थाही उत्स्फूर्तपणे बहूमोल कार्य करीत आहेत.

समारोप :–

अशा प्रकारे प्राचीन काळापासून रानटी अवस्थेत असणारा आदिवासी शिकार करून,कंदमुळे,फळे यावर आपला उदरनिर्वाह करत होता. त्यावेळी स्थिर वसाहाती नव्हत्या अस्थिर भटके मानवी जीवन होते. निसर्गाचा आश्रय घेऊन तो जगत होता . वर्णव्यवस्थामुळे भारतीय समाज विविध वर्णात आणि नंतर विविध जाती ,उपजातीत विभागला गेला.अनेक प्रदेशात हे आदिवासी विखुरले गेले. प्रत्येक जाती जमाती आपआपल्या चालीरिती,रूढी, परांपरानुसार त्या स्वतंत्र जीवन जगत राहिलेल्या आहेत. त्यासाठी भारताने स्वातंत्र्यानंतर त्याच्यासाठी काही सोयीसूविधा उपलब्ध केलेले आहेत. काही सेवाभावी संस्थानीसुध्दा त्यांच्या विकासासाठी प्रयत्न केलेले आहेत.

संदर्भ :–

1) महाराष्ट्र समाज आणि संस्कृती –कुलकर्णी अ. रा.–डायमंड पाब्लिकेशन्स पुणे,2008
2) भारतीय संस्कृती कोश–संपा. पं. महादेवशास्त्री जोशी–भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे (खंड प्रथम)
3) जातिसंस्थेचा इतिहास–संजय सोनवणी –प्राजक्ता प्रकाशन, पुणे पहिली आवृत्ती–
29 नोव्हेंबर 2014
4) भारतीय इतिहास आणि संस्कृती–इतिहास संशोधन मंडळ, धुळे–त्रैमासिक–जानेवारी–मार्च 2012